सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य,नागपूर**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३रा माळा,दीक्षाभूमी रोड,श्रद्धानंद पेठ, नागपूर- ४४००२२
दूरध्वनी क्र. 0712-2959381 CIN:U85300PN2019NPL187405 ई मेल-mahajyotingp@gmail.com

**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), मार्फत राज्यातील इतर मागासवर्गीय, भटक्या जाती- विमुक्त जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना IBPS-PO,LIC-AAO तसेच तत्सम स्पर्धा परीक्षेसाठी मोफत ऑफलाईन प्रशिक्षण सत्र 2022-23**

**योजना**

IBPS-PO,LIC-AAO तसेच तत्सम 2023 मध्ये होणाऱ्या परीक्षांकरिता इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील 1000 उमेदवारांना 2022-23 मधील सत्रातील IBPS-PO,LIC-AAO परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी मोफत ऑफलाईन पद्धतीने महाज्योती मार्फत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्या करिता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

## अ.योजनेच्या लाभासाठी पात्रता:

1. उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
2. उमेदवार इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्ग यापैकी असावा.
3. उमेदवार नॉन-क्रिमिलेअर उत्पन्न गटातील असावा.
4. उमेदवार हा पदवीचे शिक्षण पूर्ण केलेला किंवा पदवीच्या अंतिम वर्षाला असणारे विद्यार्थी सुद्धा या प्रशिक्षणाकरिता अर्ज करू शकतात.
5. वयोमर्यादा: 20 ते 33 वर्ष (दिव्यांग उमेदवारांसाठी 40 वर्षे ही वयोमर्यादा असेल)

## ब.अर्ज करण्यासाठी आवश्यक वैयक्तिक कागदपत्रे:

1. आधार कार्ड
2. रहिवासी दाखला
3. जातीचा दाखला
4. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र
5. 10 वी उत्तीर्ण गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र
6. 12 वी उत्तीर्ण गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र
7. पदवी उत्तीर्ण गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र
8. पदव्युत्तर उत्तीर्ण गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र
9. दिव्यांग असल्यास 40% पेक्षा जास्त प्रमाणात असलेल्या दिव्यांगत्वाचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला

## क.अर्ज कसा करावा:

1. महाज्योतीच्या www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **"Application for IBPS-PO, LIC-AAO Pre Exam Training 2022-23"** यावर जाऊन ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत 'ब 'मध्ये नमूद कागदपत्रे स्वाक्षांकीत करून स्पष्ट दिसतील असे स्कॅन करून उपलोड करावे.
3. पदवीच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या उमेदवाराने महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
   - प्रशिक्षणाचा कालावधी— 6 महिने
   - विद्यावेतन--रु .6000/-
   - प्रशिक्षणार्थी संख्या : 600

## ड.आरक्षण:

1. इतर मागासवर्ग,विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील 30% जागा महिलांसाठी आरक्षित आहे.
2. इतर मागासवर्ग,विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील 5% जागा दिव्यांगाकरिता आरक्षित आहे.( दिव्यांग प्रमाण-40% पेक्षा जास्त)
3. **सामाजिक प्रवर्गनिहाय**
4. **विभागणी:**

| अ.क्र. | प्रवर्ग | आरक्षणाची टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | इतर मागासवर्ग | 59% |
| 2 | विमुक्त जाती - भटक्या जमाती | 35%<br>निरधीसुचित जमाती (अ) - 10%<br>भटक्या जमाती (ब) - 8%<br>भटक्या जमाती (क) - 11%<br>भटक्या जमाती (ड) - 6% |
| 3 | विशेष मागास प्रवर्ग | 6% |

## ➢ प्रशिक्षणाच्या अति व शर्ती:

1. अर्ज करण्याचा अंतिम दि 25/01/2023 आहे.
2. विहित नमुन्यामध्ये कागदपत्रांसहित अर्ज केलेल्या पात्र उमेदवारांची छाननी परीक्षा (Screening Test) घेऊन प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येईल.

3. प्रशिक्षणाकरिता निवड झालेले उमेदवार ज्या दिनांकास रुजू होतील त्या दिवासापासून त्यांना रु.6000/- प्रती महिना या दराने विद्यावेतन लागू होईल. प्रत्यक्ष प्रशिक्षणास 75% उपस्थिती असणाऱ्या उमेदवारांनाच विद्यावेतन देण्यात येईल.
4. उमेदवारांनी विद्यावेतन जमा करण्यासाठी आधार क्रमांकाशी संलग्न बँक खाते देणे अनिवार्य आहे.
5. महाज्योती कडे अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने सारथी, पुणे या संस्थेकडील याच परीक्षेच्या प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला नसावा. तसेच महाज्योती कडील सदर प्रशिक्षणाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रशिक्षण योजनेत अधिछात्रवृत्तीचा लाभ धारक नसावा. उमेदवाराने अशा प्रकारचा दुबार लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवाराविरुद्ध नियमाप्रमाणे कारवाही करण्यात येईल.
6. सदर प्रशिक्षणासाठी अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने वरील अटी व शर्तीचा भंग केल्याचे तसेच चुकीची किंवा खोटी कागदपत्रे/ महिती सादर केल्यास त्यांचेवर झालेल्या प्रशिक्षण खर्चाची त्यांचेकडून वसुली करण्यात यईल व यापुढे महाज्योतीच्या कोणत्याही योजनांचा लाभ घेण्यास ते पात्र असणार नाही.
7. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांना असतील.
8. पोस्टाने किंवा ईमेल द्वारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
9. अर्ज भरताना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या कॉल सेंटर वर पुढील क्रमांकावर सकाळी 10.00 ते सांयकाळी 6.00 या वेळात संपर्क करावा. संपर्क क्रमांक :- 8956775376, 8956775377, 8956775378, 8956775379, 895677538

व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर